**अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,**
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला, पुणे- ४११ ००१.
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२४८१५ फॅक्स क्रमांक ०२०-२६१५८७८
E-mail Id – igoffice.est1-mh@gov.in / E-mail Id- est1igp@gmail.com

जाक्र.आस्था/तात्पुरतीसेवाजेसू/वरिष्ठलिपीक/क-१(३)२०१८ 5561 पुणे दिनांक 13/०६/२०१८

**विषय :** कारागृह विभागातील वरिष्ठ लिपीक संवर्गातील पदांची
दि.०१/०१/२०१८ ची तात्पुरती सेवाजेष्ठता सूची प्रसिध्द करणे बाबत. .

**संदर्भ :** शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०११
दिनांक २१/१०/२०११.

कारागृह विभागात वरिष्ठ लिपीक संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक ०१/०१/२०१८ ते ३१/१२/२०१८ या कालावधीची दिनांक ०१/०१/२०१८ स्थित तात्पुरती ज्येष्ठतासूची सोबत जोडण्यात आलेली आहे.

सदर तात्पुरती ज्येठतासूची सर्व संबंधीत कर्मचा-यांना ( रजेवर/ प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचा-यांसह) निदर्शनास आणावी व तसे कळविल्याबाबत त्यांची स्वाक्षरी घेतलेली प्रत अभिलेखात ठेवावी. तसेच सदर तात्पुरत्या ज्येष्ठतासूची संदर्भातील आक्षेप/ त्रुटी असल्यास त्याबाबत संबंधितांनी दिनांक ११ जुलै, २०१८ पर्यंत निवेदन सादर करावे. त्यानंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही, अशा सूचना संबंधीताना द्याव्यात. प्राप्त झालेल्या निवेदनातील वस्तुस्थिती संबंधीतांच्या उपलब्ध अभिलेखावरुन तपासून सदर निवेदने, सविस्तर अभिप्रायांसह या कार्यालयास दिनांक १८ जुलै, २०१८ पर्यंत सादर करावीत. विहित कालावधीत आक्षेप/ माहिती प्राप्त न झाल्यास सदर तात्पुरती ज्येठतासूचीबाबत कोणाचाही आक्षेप नसल्याचे गृहीत धरुन अंतिम जेष्ठतासूची प्रसिध्द करण्यात येईल.

सोबतच्या सूचीमधील नमुद केलेली जन्मतारीख, जातवैधतेबाबतची माहिती संबंधीताचे सेवापुस्तकामधील माहिती सोबत तपासून पाहण्यात यावी व उक्त माहिती बरोबर असल्यास अधीक्षकांचे प्रमाणपत्र सादर करावे. तसेच मागासवर्गीय कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन तसा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

**(मा.अ.पो.म.सं. व का.म.नि यांचे मान्यतेने)**

12/6/18

**( डॉ विठ्ठल जाधव )**
**विशेष पोलीस महानिरीक्षक (मु.)**
**कारागृह व सुधारसेवा,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रति,**

विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह)दक्षिण विभाग,मुंबई
कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग,पुणे/ मध्य विभाग,औरंगाबाद/पूर्व विभाग,नागपूर.
प्राचार्य, तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे
अधीक्षक, मध्यवर्ती/जिल्हा कारागृह, प्राचार्य, किशोर सुधारालय,नाशिक
अधीक्षक, स्वतंत्रपूर खुली वसाहत, आटपाडी, जि-सांगली/अधीक्षक, खुले जिल्हा कारागृह, पैठण
कक्ष अधिकारी, कक्ष क्रमांक ४, ५, ८ व ११, अपोमसं व कामनि कार्यालय, पुणे

**प्रत** : कक्ष अधिकारी, कक्ष क्रमांक १३ (ई-सेल),अपोमसं व कामनि, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाही करीता.

२/- वरिष्ठ लिपीक पदावरील कर्मचा-यांची सेवाजेष्ठता सूची कारागृह विभागाच्या वेब साईटवर प्रसिध्द करुन तसे कक्ष क्रमांक १ (३) ला अवगत करावे.